# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ३०/०५/२०१८**

## १) जबरी चोरी :-

**वजिराबाद :-** दिनांक २८.०५.२०१८ रोजीचे १८.१५ वा. चे सुमारास, कोर्टाचे पाठीमागे वजिराबाद, नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस थापड-बुक्याने मारहाण करुन दुखापत केली व फिर्यादीचे खिशातील मोबाईल किंमत अंदाजे ६,०००/-रुपये व नगदी २०,०००/-रुपये असे एकुण २६,०००/- रुपयाचा मुद्येमाल जबरीने काढुन घेतले. वगैरे **फिर्यादी शेख हुसेन पि.शेख कासीम, वय २३ वर्षे व्यवसाय वेटर रा.महेबुबनगर पिंपळगाव, ता.नायगाव जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे.वजिराबाद** गुरनं ११५/२०१८ कलम ३९२, ३९४, ३४ भादंवि कायदया प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/पठारे, मो.क्रं. ८८८८८१०९५७** हे करीत आहेत.

## २) मो.सा.चोरी :-

**अ) नांदेड ग्रामीण :-** दिनांक २५.०५.२०१८ रोजी चे २०.०० ते २१.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे काकाचे घरासमोरुन हडको, नांदेड येथे, यातील फिर्यादीची हिरोहोंडा स्पेल्डेंर प्रो.कंपनीची मो.सा.क्रमांक एम.एच.२६/ए.एल.३६६२ अंदाजे किंमत २०,०००/- रुपयाची नमुद ठिकाणी लावुन घरात झोपले असता कोणीतरी आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी श्रीनिवास गोविंद लाडगे, वय २९ वर्षे व्यवसाय मजुरी रा.नायगाव, जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.नांदेड ग्रामीण** गुरनं २०४/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/४३६ मोकले, मो.क्रं. ०२४६२-२२६३७३** हे करीत आहेत.

**ब) वजिराबाद :-** दिनांक २७.०५.२०१८ रोजी चे १२.०० ते दि.२८.०५.२०१८ चे १७.३० वा. चे दरम्यान, यशश्री हॉस्पीटल वजिराबाद, नांदेड येथे, यातील फिर्यादीची हिरो होंडा पॅशन प्रो.कंपनीची मो.सा.क्रमांक एम.एच.२६/ए.एम.१७७८ अंदाजे किंमत ३०,०००/- रुपयाची नमुद ठिकाणी लावली असता कोणीतरी आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी कृष्णा मारोती निरडे, वय २७ वर्षे व्यवसाय नौकरी रा.गऊळ, ता.कंधार जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.वजिराबाद** गुरनं ११६/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/२७२१ शिंदे , मो.क्रं.९५५२५१६२८३** हे करीत आहेत.

## ३) चोरी :-

**मुक्रमाबाद :-** दिनांक १५.०५.२०१८ ते २३.०५.२०१८ चे दरम्यान, वेळ नक्की नाही कुंदराळा मध्यम प्रकल्प, ता.मुखेड जि.नांदेड येथे, यातील अज्ञात आरोपीने नमुद ठिकाणाहुन पाण बुडी विद्युत मोटार पाच एच.पी.ची मॉडल ए.एफ.एम.३१ जे.ॲक्वा टॅक्स कंपनीची अंदाजे किंमत २६,८००/- रुपयाची नमुद ठिकाणीहुन कोणीतरी आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी रामराव भाऊराव पोले, वय ४७ वर्षे व्यवसाय सरपंच रा.मौ.सुगाव (खु), ता.मुखेड जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.मुक्रमाबाद** गुरनं ७२/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१९७२ सुर्यवंशी, मो.क्रं. ९८६७१९८३६** हे करीत आहेत.

## ४) फसवणुक :-

**वजिराबाद :-** दिनांक २७.०५.२०१८ रोजी १३.०० ते दि.२८.०५.२०१८ चे ०८.०० वा.चे दरम्यान,बसस्थानक, नांदेड येथे यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी बाईस व तिचे मैत्रीणीस अकोला येथे कुरकुरे चे कंपनीत नौकरी लावतो असे खोटे सांगुन १,१५,०००/-रुपयाचे परस्पर विक्री केली होती त्यातील ४०,०००/- रुपये कंपनीतील कामाचे म्हणुन फिर्यादीस ॲडव्हॉन्स दिले होते परंतु फिर्यादीस व तिचे मैत्रीणीस संशय आल्याने त्याने आरोपीचे ताब्यातुन सुटका करुन घेतले, यातील नमुद आरोपीतांनी विश्वासघात करुन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी संजीवनी भ्र.दत्तात्रय सुर्यवंशी वय २६ वर्षे व्यवसाय व्यापार रा.पंकजनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे.वजिराबाद** गुरनं ११७/२०१८ कलम ४२०, ३७० (३), ३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/कड्डु, मो.क्रं.८०८७०७२९१९** हे करीत आहेत.

## ५) अवैध होर्डीग :-

**भाग्यनगर :-** दिनांक २६.०५.२०१८ चे सुमारास रात्री वेळ नक्की नाही, घराचे वर घर.नं.०१-१२-५१६ अशोक नगर, नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिररीत्या अनाधिकृत होर्डीग लावले सदर होर्डीग वादळी पावसामुळे व वाऱ्यामुळे होर्डीग विद्युत वितरण कंपनीचे विद्युत तारावर पडुन विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे विद्युत कंपनीचे २५,०००/- रुपयाचे नुकसान केले व जिवीतहानी होण्याची शक्यता माहीत असतांना सुध्दा होर्डीग लावले व सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपन केले. वगैरे **फिर्यादी सुधीर बापुराव इंगोले, वय ५१ वर्षे व्यवसाय सहायक कार्यालय क्रमांक अशोक नगर नांदेड, वाघाळा शहर महानगर पालीका, नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.भाग्यनगर** गुरनं १५८/२०१८ कलम महाराष्ट्र विद्रुपन कायदा १९९५ कलम -३ प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१७८७ मुत्येपोड, मो.क्रं. ९९२३१०३१८७** हे करीत आहेत.

## ६) बेकायदेशीररीत्या हत्यार बाळगुन मिळुन आला :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक २९.०५.२०१८ रोजी ०६.४५ वा.चे सुमारास, S.G.G.S. कॉलेज समोर सार्वजनिक रोडवर विष्णुपुरी, नांदेड येथे यातील आरोपी हा त्याचे जवळ गावठी कट्ठा व खंजरचा धाक दाखवुन लोकांमध्ये दहशत निर्माण करीत असतांना हत्यार बाळगुन मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/४३६ एकनाथ सखाराम मोकले, ने.पो.स्टे.नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे.नांदेड ग्रामीण** गुरनं २०६/२०१८ कलम ६/२८, ४/२५, भा.ह.का. प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/मोरे, मो.क्र. ०२४६२-२३६३७३** हे करीत आहेत.

## ७) गळफास घेवुन अकस्मात मृत्यु :-

**कुंटूर :-** दिनांक २८.०५.२०१८ ते दि.२९.०५.२०१८ चे सुमारास पहाटे वेळ नक्की नाही सोमठाणा कोंडराव कदम यांचे शेतात, ता.नायगांव जि.नांदेड येथे, यातील **मयत नामे विलास मुकुंद कदम, वय ३२ वर्षे रा.हिप्परगा (जा), ता.नायगाव जि.नांदेड** हा नमुद ठिकाणी लाईटचे पोल ला पांढऱ्या दस्तीने गळफास घेवुन मरण पावला. वगैरे **खबर देणार उत्तम नागोराव कदम, वय ४० वर्षे व्यवसाय शेती रा.हिप्परगा (जा), ता.नायगांव जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.कुंटूर** आ.मृ. १०/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास सपोउपनि/भोळे, मो.क्र. ९४२०४०३५०९** हे करीत आहेत.

## ८) विषारी औषध पिऊन मृत्यु :-

**किनवट :-** दिनांक २८.०५.२०१८ रोजी चे १९.३० वा. चे पुर्वी मौ.अंबाडी शिवार काशीनाथ मेश्राम यांचे शेतात, ता.किनवट जि.नांदेड येथे, यातील **मयत नामे सुरेंद्र जंगु सिडाम, वय २२ वर्षे रा.अंबाडी, ता.किनवट जि.नांदेड** हा कोणत्यातरी कारणावरुन कोणतेतरी विषारी औषध पिवुन मरण पावला. वगैरे **खबर देणार ज्ञानेश्वर जंगु सिडाम, वय ३३ वर्षे व्यवसाय मजुरी रा.अंबाडी, ता.किनवट जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.किनवट** आ.मृ. १२/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोउपनि/आगलावे, मो.क्र. ९७६७७७७८८४** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४